RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १०२(२)] शुक्रवार, ऑक्टोबर २३, २०२०/कार्तिक १, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑक्टोबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक/१५२०/प्र.क्र. ७३/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे, आणि त्यामुळे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही ;

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या उप-कलम (४) च्या परंतुकासह, उप-कलमे (१),(२) आणि (३) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये आणखी सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

**१.** या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (तिसरी सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

**२.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५, च्या नियम १७ मध्ये, उप-नियम (४ख) मध्ये, खालील परंतुक दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"परंतु असे की, १ एप्रिल २०२० रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या कालावधीपासून, या अधिनियमाखाली नोंदणीकृत असलेले फुटकळ निर्गममार्ग ज्यांनी महाराष्ट्र राज्यांतर्गत नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेल्या हाय स्पीड डिझेल ऑईल किंवा पेट्रोल यांचीच विक्री केलेली असेल व जे कोणत्याही तेल कंपनीच्या मालकीचे नसतील, ते या उप-नियमाखालील विवरण दाखल करण्यास पात्र असणार नाहीत.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**
शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd October 2020

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT / 1520 / CR-73 / Tax-1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section *(4)* of Section 83 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)*, *(2)* and *(3)* read with the proviso to sub-section *(4)* of Section 83 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, namely.—

**1.** These rules may be called the Maharashtra Value Added Tax (Third Amendment) Rules, 2020.

**2**. In rule 17 of the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, in sub-rule (*4B*), the following proviso shall be added, namely : —

"Provided that, from the period starting on or after 1st April 2020, the retail outlets, not owned by any Oil Company, registered under the Act and who have effected sales of High Speed Diesel Oil or Petrol purchased from the registered dealers, within the State of Maharashtra, shall not be liable to file return under this sub-rule.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.